सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.२९/ कोषा प्रशा-४, दि. १५/०६/२०२६.

**विषय** :- नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.२९/ कोषा प्रशा-४, दि. १५/०६/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०६१५११५९२०९३०५ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 19-06-2026 17:56:23

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना / कायदा व सुव्यवस्था / आर्थिक गुन्हे / दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती / प्रशासन / वाहतूक / प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह).
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था / प्रशासन / नियोजन व समन्वय/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग सह).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सूचना...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४**
दालन क्रमांक ३३९, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५ जून, २०२६

**संदर्भ:** शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४ दि.०१.०४.२०२६

## प्रस्तावना –

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये, नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार पुणे विभागाकरीता दोन टप्प्यामध्ये नवीन सेवार्थ प्रणालीची अंमलबजावणी करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यातील पुणे विभागातील सर्व कोषागरातील मध्यम व लघु आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व डेटा मायग्रेशनसह नवीन सेवार्थ प्रणालीत माहे मे २०२६ देय जुन २०२६ करीता नियमित वेतन देयके संस्करीत करण्यात आलेली आहेत तसेच प्रशासकीय विभागांतर्गत मोठ्या आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा डेटा मायग्रेशन करण्यात येत असून या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना माहे जुन २०२६ देय जुलै २०२६ ची वेतन देयके नवीन सेवार्थ प्रणालीत संस्करीत करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते.

तद्अनुषंगाने, आता नवीन सेवार्थ प्रणालीच्या पुढील टप्प्यातील अंमलबजावणी सर्व प्रशासकीय विभागांतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागात करण्याचे विचाराधिन होते. त्यास अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांना या परिपत्रकान्वये सर्वसमावेशक सूचना देण्यात येत आहेत.

## शासन परिपत्रक :-

नवीन सेवार्थ प्रणालीची पुढील टप्प्यातील अंमलबजावणी करण्यासाठी संचालनालयीन स्तरावर खालीलप्रमाणे मध्यवर्ती टीमची संरचना करण्यात आली आहे

१. संचालक
२. सहसंचालक (सुधारणा/संगणक)
३. सहसंचालक (कोषा)

४. उपसंचालक (संगणक)
५. प्रकल्प व्यवस्थापक (सेवार्थ)
६. लेखा अधिकारी (सेवार्थ)
७. लेखा अधिकारी

सदर मध्यवर्ती टीमकडून खालीलप्रमाणे कामकाज हाताळण्यात येईल.

१. नवीन सेवार्थ प्रणालीच्या पुढील टप्प्यातील अंमलबजावणी कामकाजावर पूर्ण नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.
२. सर्व विभागीय सहसंचालक / सर्व कोषागार अधिकाऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे ऑनलाईन/ ऑफलाईन मार्गदर्शन करण्यात येणार आहे.
३. वेळोवेळी संबंधित कोषागार कार्यालयांना भेटी देऊन प्रशिक्षणाचा आणि प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेण्यात येईल.
४. छत्रपती संभाजी नगर विभागामध्ये माहे जून, २०२६ पासून नवीन सेवार्थ प्रणालीची अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले असून त्याकरीता मध्यवर्ती टीम, विभागीय सहसंचालक पातळीवरील टीम व कोषागार स्तरावरील टीम गठीत करण्यात येतील.
५. सदर टीमच्या माध्यमातून छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व कोषागार व उपकोषागारातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना डेटा मायग्रेशन, प्रशिक्षण तसेच नवीन सेवार्थ प्रणालीची प्रत्यक्ष अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**छत्रपती संभाजी नगर विभागाकरीता नवीन सेवार्थ प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.**

**<u>अ) डेटा मायग्रेशन व पुढील कामकाज</u>**

डेटा मायग्रेट करण्यापूर्वी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना खालील कामकाज पूर्ण करावयाचे आहे. छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी डेटा अपडेशन युटीलीटी (Incorrect Data Updation Utility) मधील सर्व कर्मचाऱ्यांचा डेटा अपडेट करावयाचा आहे.

१. डेटा अपडेशन युटीलीटी (Incorrect Data Updation Utility) मधील सर्व कर्मचाऱ्यांचा डेटा अपडेट करणे यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांचे नाव सेवापुस्तकातील नोंदविण्यात आलेल्या नावाप्रमाणेच सेवार्थ प्रणालीत नोंदविण्यात यावे. तसेच अधिकारी/कर्मचारी यांचे बाबतीत सेवार्थ प्रणालीत नोंदविण्यात आलेला PAN क्रमांक अचूक असल्याची खात्री करावी.
२. एम्प्लॉई स्टॅटीस्टीक्स (Employee Statistics) नुसार सर्व डेटा तपासणी करणे.
३. मंजूर असलेल्या पदांचा ताळमेळ पूर्ण झाल्याची खात्री करणे.

४. सध्याच्या लॉगीनमध्ये असलेले सर्व कर्मचारी बिल ग्रुपला अटॅच असल्याची खात्री करणे.
५. सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे कर्जे व अग्रिमे अद्ययावत असल्याची खात्री करणे.
६. कर्मचा-याचा शासकीय निवासस्थानाचा तपशील अद्ययावत करणे.
७. तसेच नवीन प्रणालीमध्ये भरण्यात येणाऱ्या माहितीसंबंधात देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये सर्व अधिकारी/कर्मचारी यांची माहिती संकलित करुन ठेवणे. यामध्ये प्रामुख्याने फोटो व स्वाक्षरी, कुटुंबाचा तपशील, नामनिर्देशित व्यक्तीची माहिती व त्यांच्या बँक खात्याचा तपशील ही माहिती संकलित करुन ठेवण्यासाठी सूचित करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९(२)/कोषा प्रशा-४, दिनांक २२/०५/२०२६ मध्ये निर्देशित केल्यानुसार सेवार्थ प्रणालीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव, जन्मदिनांक , मूळ नेमणूकीचा दिनांक, कार्यालयातील नेमणूकीचा दिनांक तसेच सेवानिवृत्ती दिनांक या नोंदी अद्ययावत करण्यासाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातर्गत छत्रपती संभाजी नगर विभागानेसुध्दा कार्यवाही करावयाची आहे.

तरी याबाबत, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाअंतर्गत, सर्व प्रादेशिक विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या बाबी अद्ययावत करण्यासाठी दिलेल्या निर्देशाचे पालन करणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजी नगर विभागातील प्रत्येक कोषागार कार्यालयाने आपल्या जिल्हा कोषागाराच्या तसेच उपकोषागाराच्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची यादी प्रशासकीय/क्षेत्रिय विभागनिहाय (उदा. प्रशासकीय विभाग- वित्त व क्षेत्रिय विभाग DAT) अद्ययावत करुन ठेवावयाची आहे, म्हणजे सदर यादीनुसार सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा डेटा मायग्रेट करताना अडचणी येणार नाहीत. सध्याच्या सेवार्थ प्रणालीतून सुध्दा प्रत्येक कोषागाराला त्यांच्या अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची कोषागार व उपकोषागार निहाय यादी देण्यात येणार आहे.

डेटा मायग्रेशन करण्यासाठी एनआयसी, पुणे यांना प्रत्येक कोषागार स्तरावर एक लॉगीन नव्याने निर्माण करण्यासाठी सूचित करण्यात आले आहे. सदर लॉगीन निर्माण केल्यानंतर कोषागार कार्यालयातील डीबीए मार्फत सदर डेटा प्रणालीमधून मायग्रेट करण्यात येणार आहे. तसेच संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी डेटा अचूक असल्याबाबत तसेच सर्व डेटा मायग्रेट झाल्याबाबत, खात्री केल्याची (Confirm) नोंद प्रणालीमध्ये केल्यांनतर डेटा Approve करण्यात येणार आहे. तसेच आवश्यकतेनुसार सदर डेटा ॲडमिन लॉगीन मधून सुध्दा मायग्रेट व Approve करण्यात येणार आहे.

उपरोक्तप्रमाणे डेटा मायग्रेट केल्यानंतर खालील बाबींवर डेटा उपलब्ध झाल्याची संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी खात्री करावयाची आहे.

**GR Master, DDO Schemes, Bill Groups, Permanent Posts, Temporary Posts, Employee (along with DOB, PAN, AADHAR), DDO wise NG Recoveries, Employee Wise NG Recoveries, Employee Address Details, Employee Nominee Details, Employee Quarter Details, Employee Loan Details.**

उपरोक्त प्रमाणे डेटा प्राप्त झाल्याची खात्री केल्यानंतरच सदर डेटा तपासणी करुन वेरीफाय करण्यासाठी कोषागार कार्यालयातील डीबीए यांना दिलेल्या लॉगीन मधून तसेच आवश्यकता वाटल्यास, ॲडमिन लॉगीन मधून ॲप्रुव्ह करण्यात येईल व त्यानंतरच संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याला डेटा पडताळणी करण्यासाठी उपलब्ध होईल.

यापुढील कामकाज करण्यासाठी प्रथम लॉगीन करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यास लॉगीन देण्यात येईल. सदर लॉगीन मधून अधिकारी / कर्मचाऱ्यांना ठराविक रोल द्यावयाचा आहे. त्यांचा डेटा प्रथमत: तपासून डीडीओ लॉगीनमधून वेरीफाय करुन घ्यावयाचा आहे.

तसेच ज्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची नोंद कोषागारात ई-हस्ताक्षरासाठी झालेली आहे. त्यांनाच डीडीओचा रोल अद्ययावत करण्यात येणार आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांपैकी ज्यांना सहायकाचा रोल द्यावयाचा आहे त्यांची माहिती तपासून वेरीफाय करुन त्यांना सहायकाचा रोल मॅप करण्यात यावा.

डेटा मायग्रेशन केल्यानंतर व उपरोक्तप्रमाणे रोल मॅपींग केल्यानंतर उर्वरित सर्व कर्मचाऱ्यांचा डेटा तपासणी करुन वेरीफाय करण्यात यावा व त्यापुढे वेतन देयकाचे कामकाज करुन वेतन देयके संस्करीत करावयाची आहेत. तसेच पूर्ण डेटा पडताळणी करुन झाल्यानंतर प्रणालीमध्ये उपलब्ध असलेले प्रमाणपत्र ई-हस्ताक्षर केल्यानंतर संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे पुढील मासिक देयक संस्करीत होणार आहे.

**ब) प्रशिक्षण**

छत्रपती संभाजी नगर विभागातील अनुक्रमे छत्रपती संभाजी नगर, बीड, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी या कोषागारातील तसेच उपकोषागारातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.

छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व कोषागारातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाचे नियोजन करण्यासाठी विभागीय सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

**प्रशिक्षण देण्यासाठी विभागीय सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर यांच्या नियंत्रणाखाली खालीलप्रमाणे टीम कार्यरत राहील.**

१. सहाय्यक संचालक प्रशिक्षण,

२. लेखा अधिकारी प्रशिक्षण

३. लेखा अधिकारी संगणक
४. लिपिक/कनिष्ठ लेखापाल (संगणक व प्रशिक्षण)
५. सहसंचालक कार्यालयातील वेतन देयक लिपिक/कनिष्ठ लेखापाल (Master Trainers)

उपरोक्त टीममार्फत छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व कोषागार तसेच उपकोषागारातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना नियोजित वेळेतच प्रशिक्षण पूर्ण करण्याची तसेच डेटा मायग्रेशन पूर्ण करुन विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिका-यांची देयके विहीत कालावधीतच पूर्ण करण्याची जबाबदारी विभागीय सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर यांना देण्यात आली असून सदर प्रशिक्षणाचा, डेटा मायग्रेशन व वेतन देयके संस्करीत होण्याच्या कार्यवाहीचा वेळोवेळी अहवाल संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावयाची आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर- कोषागार स्तरावर व उपकोषागार स्तरावर प्रशिक्षण देण्यासाठी खालीलप्रमाणे टीम कार्यरत राहील.

१. कोषागार अधिकारी
२. लेखा अधिकारी (संगणक)
३. सहायक लेखा अधिकारी (आस्थापना)
४. जिल्हास्तरीय DBA
५. कनिष्ठ लेखापाल / लिपीक टंकलेखक (वेतन देयक लिपीक) (Master Trainers)
६. कनिष्ठ लेखापाल / लिपीक टंकलेखक (एनपीएस कर्मचारी ) (Master Trainers)
७. हेल्प डेस्क सहायक (Master Trainers)

उपरोक्त टीममार्फत छत्रपती संभाजी नगर कोषागारातील तसेच उपकोषागारातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना नियोजित वेळेतच प्रशिक्षण पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी व त्यांनी सदर प्रशिक्षणाचा वेळोवेळी अहवाल विभागीय सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर यांना सादर करण्याची दक्षता घ्यावयाची आहे.

कालबध्द प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी, आवश्यकता भासल्यास, छत्रपती संभाजी नगर विभागातील इतर कोषागारात कार्यरत असणाऱ्या Master Trainers यांनी नजीकच्या कोषागार तसेच उपकोषागाराच्या अधिनस्त असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थित राहावयाचे आहे.

जिल्हा स्तरावरील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देताना आवश्यकता असल्यास तसेच विभागीय सह संचालकांनी व कोषागार कार्यालयांनी विनंती केल्यास, संचालनालयातील मध्यवर्ती टीममधील संबंधित अधिकारी सदर प्रशिक्षणास उपस्थित राहून तेथील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या शंकांचे निरसन करतील.

(I) छत्रपती संभाजी नगर विभागातील सर्व कोषागारातील आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना पूर्ण प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने प्रशिक्षणानंतर डेटा मायग्रेशन करण्यात येणार आहे.

(II) या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना माहे मे, २०२६ देय माहे जुन, २०२६ करीता पायलट रन नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये घेण्यात येणार असून प्रत्यक्ष नवीन सेवार्थ प्रणालीमधून यांना माहे जुन, २०२६ देय माहे जुलै, २०२६ पासून नियमित वेतन देयके संस्करीत करण्यासाठी सूचित करण्यात येईल.

(III) माहे जून, २०२६ देय जुलै, २०२६ पासून उपरोक्त विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना जुन्या सेवार्थ प्रणालीमध्ये कामकाज करता येणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०६१५११५९२०९३०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.06.15 12:01:51 +05'30'

( रविकुमार लिंगनवाड )
**शासनाचे उप सचिव**

**प्रति,**

**१. छत्रपती संभाजी नगर विभागांतर्गंत सर्व आहरण व संवितरण अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी.**

**२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.**

**यांना विनंती करण्यात येते की, छत्रपती संभाजी नगर विभागातील त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्याबाबत प्रशासकीय विभागाच्या स्तरावरुन देखील कळविण्यात यावे.**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.

७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७.सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२२.सर्व विभागीय आयुक्त
२३.सर्व जिल्हाधिकारी
२४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७.सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती/नागपूर
२९.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०.निवड नस्ती/कोषा प्रशा-४